दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ६२ मंगळवार दि.०९ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# देशात पहिल्यांदाच होणार डिजिटल जनगणना

नवी दिल्ली : कोरोनामुळे २०२१ साली होऊ न शकलेली जनगणना आता होऊ घातली आहे. यासंदर्भातील पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. यावेळची जनगणना ही काही बाबतींत वेगळी ठरली आहे. कारण यावेळी गोळा केल्या जाणा–या माहितीमध्ये जातीसंदर्भातील माहितीचाही समावेश करण्यात आला आहे. त्याशिवाय, पहिल्यांदाच ही माहिती गोळा करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर होणार आहे. २०२६–२७ या काळात दोन टप्प्यांमध्ये जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यासाठी देशभरातील जवळपास ३४ लाख कर्मचा–यांची या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

यंदा होणारी जनगणना ही देशातली पहिली डिजिटल जनगणना ठरली आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया अर्थात जनगणनेची जबाबदारी असणा–या आरजीआयने प्रत्यक्ष लोकांची माहिती गोळा करणा–या कर्मचा–यांना त्यांच्याच मोबाईल फोनवर जनगणनेची माहिती गोळा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यानंतर मोबाईलमधील हा डेटा केंद्रीय सर्व्हरवर ट्रान्सफर केला जाईल. कर्मचा–यांच्या मोबाईलमध्ये खास जनगणनेसाठी तयार करण्यात आलेले ॲप डाऊनलोड करून दिलं जाईल. या ॲपवर इंग्रजीसह प्रादेशिक भाषांमध्येही माहिती



जमा करता येणार आहे. अँड्रॉइड व आयओएस अशा दोन्ही प्रणालींवर हे ॲप वापरता येईल.

जर काही कारणास्तव माहिती गोळा करणा–या कर्मचा–याने मोबाईल ॲपवर माहिती न घेता कादद्‌दावर नोंदी करून घेतल्या, तर नंतर त्यांना ती सगळी माहिती यासंदर्भातील विशिष्ट अशा वेबसाईटवर अपलोड करावी लागेल. या पद्धतीमुळे आधीप्रमाणे गोळा केलेली माहिती पुन्हा एकदा स्कॅन करणे, ऑनलाईन भरणे या गोष्टी टाळता येणार आहेत. त्यामुळे पहिल्यांदाच प्रत्यक्ष माहिती घेण्याचे काम डिजिटल पद्धतीने केले जाणार आहे.

दोन टप्प्यांत होणार जनगणनेचे काम

जनगणनेचे काम दोन टप्प्यांत केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या काळात घरांबाबतची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराची अवस्था, घरातील सोयी–सुविधा आणि प्रत्येक घरानिशी असणारी मालमत्ता याबाबतच्या माहितीचा समावेश आहे. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून त्यात प्रत्यक्ष व्यक्तींची माहिती गोळा केली जाईल. लडाख, जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड ही राज्ये वगळता इतर ठिकाणी याच पद्धतीने जनगणना होईल. या राज्यांमध्ये सप्टेंबर २०२६ मध्ये जनगणनेचे काम केले जाईल.

# डिस्चार्ज मिळताच मनोज जरांगेंचा हुंकार, थेट राज्य सरकारला दिला इशारा

मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया १७ सप्टेंबरच्या आधी सुरू करा अशी मागणी मनोज जरांगे यांनी सरकारकडे केली आहे. गॅझेटियरची तातडीने अंमलबजावणी केली नाही तर येत्या दसरा मेळाव्यात आम्हाला सरकारच्या विरोधात आमची भूमिका जाहीर करावी लागणार आहे, असा इशार जरांगे पाटील यांनी यावेळी दिला आहे.





१७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आहे. त्याच्या आत हैदराबादच्या गॅझेटियरच्या नोंदीनुसार मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू झाली पाहिजे. आम्ही जितके कौतुक केले, पुन्हा आम्हाला वाटायला नको की तुम्ही फक्त हुलकावणी देत आहात की काय? १७ सप्टेंबरच्या आत ही प्रक्रिया सुरू व्हावी अशी माझी सरकारला विनंती आहे आणि यामध्ये कोणताही बदल करू नये असे मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

तुम्ही आता ठरवलेय तर मनुष्यबळ द्या. तिघांची गावागावातील समिती आहे तिला तातडीने कामाला लावा. हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदीच्या आधारे मराठवाड्यातील मराठ्यांना किंवा हैदराबाद स्टेट जिथपर्यंत होते तिथपर्यंतच्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू झाले पाहिजे. अन्यथा मला पुन्हा नाइलाजाने मोठा निर्णय घ्यावा लागेल, असे जरांगे म्हणाले आहेत.

वेळ आली तर आमच्या गावात, आमच्या घरी येणे राजकीय नेत्यांना बंद करावे लागेल हे मात्र लक्षात ठेवा. तुमच्यावर कोणी दबाव आणेल.. जीआर कशाला काढला.. हे असे शब्द नको होते.. जर कोणाचं ऐकून आमची हेळसांड झाली तर पुन्हा खूप वाईट दिवस तुमच्या चुकीमुळे येऊ नये याची काळजी सरकारने घ्यावी, ही मी विनंती करत आहे. धमकी नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत.

गरीबाच्या पोरांनी आणि मी मिळून एक जीआर काढला की हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र द्यावेत, अर्धा महाराष्ट्र पागल झाला. काही अभ्यसकही पागल झाले. जीआर आणि त्यातील शब्द बघून आमच्या विरोधातील काही जण तर इतके पागल झाले की त्यांना झोपच येत नाहीये. इतक्या मजबूतीने जर गरीबांच्या पोरांनी जीआर काढला आहे, तर मराठवाडा १०० टक्के आरक्षणात जाणार, असे जरांगे पाटील म्हणाले आहेत.

## एनडीएने खा.श्रीकांत शिंदेंवर सोपवली 'ही' मोठी जबाबदारी

नवी दिल्ली : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची उमेदवाराचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. या निमित्ताने एनडीएतील भाजपचा मित्र पक्ष या नात्याने शिवसेनेचे खासदार डॉ. शिंदे यांच्यावर भाजप नेतृत्वाने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.मंगळवारी ९ सप्टेंबरला संसदेत उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास श्रीकांत शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपराष्ट्रपती पदाचे एनडीएचे उमेदवार व महाराष्ट्राचे राज्यपाल असलेल्या सी.पी. राधाकृष्णन यांना यापूर्वीच शिवसेनेचा पाठिंबा जाहीर केला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी नवी दिल्ली शिवसेना संसदीय पक्षाचे नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या खासदारांची बैठक पार पडली. या बैठकीला भाजप मंत्री अर्जुन राम मेघवाल उपस्थित होते. या बैठकीत मतदान कसे करायचे, मतदानाची प्रक्रिया खासदारांना समजावून सांगण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. खासदार डॉ. शिंदे यांच्याबरोबरच केंद्रीय मंत्री किरण रिजीजू आणि मंत्री राम मोहन नायडू हे एनडीए उमेदवाराचे प्रतिनिधी म्हणून काम पाहणार आहेत.

# अतिवृष्टीमुळे भुसणीतील शेतकऱ्यांचे पिक जलमय

औसा :– औसा व निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न कोलमडले; पंचनामे करून तातडीने मदत द्यावी – खा. ओमराजे निंबाळकर यांच्याअधिकाऱ्यांना सूचना



औसा तालुक्यातील भुसणी, शिवनी, आपचुंदा,जावळी, लामजना, निलंगा तालुक्यातील नदीहत्तरगा,कोकळगाव, रामतिर्थ, मदनसुरी या ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी जीवाची बाजी लावून मेहनतीने उभे केलेले सोयाबीन, तूर, कापूस यांसारखे हंगामी पिके पाण्याखाली गेली असून अनेकांचे संपूर्ण उत्पन्न उद्ध्वस्त झाले आहे.

या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांसह भुसणी गावात प्रत्यक्ष दौरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या तसेच त्यांना धीर दिला. शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे वास्तव समोर मांडले. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळावा, तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींवर त्वरित उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी देण्यात आल्या.


यावेळी सांगण्यात आले की, शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ एका वर्गापुरता मर्यादित नसून संपूर्ण समाजाच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. त्यामुळे शासनाने संवेदनशीलतेने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने मदत मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सततच्या पावसामुळे तालुक्यातील इतर काही गावांनाही फटका बसला असून शेतकऱ्यांचे संकट अधिकच गडद झाले आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी,काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्रीशैल दादा उटगे,महिला आघाडी जिल्हा संघटिका जयश्रीताई उटगे,युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे,शहरप्रमुख सुरेश दादा भुरे, तालुकाप्रमुख आबासाहेब पवार,निलंगा तालुकाप्रमुख शिवाजी चव्हाण,तालुका संघटक श्रीराम कुलकर्णी,युवासेना तालुकाप्रमुख गणेश गायकवाड तसेच इतर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# विरोधी पक्षनेतेपदासाठी सतेज पाटलांच्या नावाची चर्चा, काँग्रेस नेत्यांची मातोश्रीवर बैठक

मुंबई : राज्यातील महापालिका निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय चर्चांना वेग आला आहे. अशातच आता काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. या भेटीत महत्त्वाच्या महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने चर्चा झाली.



तसेच अंबादास दानवे यांची मुदत संपल्याने विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावरही चर्चा करण्यात आली. विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदावर काँग्रेस दावा सांगणार असून सतेज पाटील यांच्या नावाची विधान परिषद विरोधी पक्ष नेते पदासाठी वर्णी लागण्याची चर्चा आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार आणि उपनेते अमीन पटेल यांनी आज मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी जवळपास ४० ते ५० मिनिटे उभय नेत्यांमध्ये चर्चा झाली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अंबादास दानवे यांचे विरोधी पक्षनेते पदाचा कार्यकाळ २९ ऑगस्टला पूर्ण झाला आहे. त्यानंतर विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेस आग्रही आहे. सध्या विधान परिषदेत विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसचे आठ आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा आमदार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत विधान परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसने दावा केल्याची माहिती मिळत आहे. या सगळ्या संदर्भात उद्धव ठाकरे यांच्यासोबत काँग्रेस नेते चर्चा करत असल्याचीही माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

# बाप्पाच्या विसर्जन मिरवणूकीचे भाजपकडून स्वागत गोलाईतील व्यासपीठाने वेधले लातूरकरांचे लक्ष

## पोलिस प्रशासनाचाही केला सत्कार

श्री विसर्जन मिरवणूक शांततेत व उत्साहात पार पडावी तसेच कायदा व सुव्यवस्था आबाधीत रहावी यासाठी पोलिस प्रशासनाकडून मोठा बंदोबस्त ठेवून चोख भूमिका पार पाडली. विसर्जन मिरवणूकीदरम्यान पोलिस प्रशासनाने प्रत्येक गणेश मंडळांसह राजकीय पदाधिकाजयांची सुसंवाद साधून विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडली. त्यामुळे विसर्जन मिरवणूकीची सांगता झाल्यानंतर शहर भाजपाच्या वतीने पोलिस अधिकारी व कर्मचाजयांचा सत्कार करण्यात आला.



लातूर/प्रतिनिधी :– लहानापासून थोरापर्यंतच्या उत्साहाला उधाण आणाजया सार्वजनिक गणेशोत्सवाची सांगता बाप्पाच्या विसर्जन मिरवणूकीने झालेली आहे. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाकडून काढण्यात आलेल्या विसर्जन मिरवणूकीचे लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने स्वागत करून गणेश मंडळांच्या पदाधिकाजयांचा भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सत्कार केला. गोलाई परिसरात उभारण्यात आलेल्या शहर भाजपाच्या स्वागत व्यासपीठाने लातूरकरांसह गणेश भक्तांचेही लक्ष वेधून घेतले होते. राज्यभरात संपन्न झालेला सार्वजनिक गणेश उत्सवात लहानापासून थोरापर्यंतच्या उत्साहाला उधाण आले होते. उत्सवातील दहा दिवसांच्या काळात लातूर शहरात सर्वत्र भक्तीमय वातावरण व बाप्पाचा गजर ऐकण्यास येत होता. शनिवार दि. ६ सप्टेंबर सार्वजनिक गणेश उत्सवाची सांगता विसर्जन मिरवणूकीने झाली. लातूर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांकडून या विसर्जन मिरवणूकीसाठी वेगवेगळ्या देखाव्यासह पारंपारिक वाद्यांचा गजर करणाजया कलावंतांचा समावेश करण्यात आला होता. गणेश मंडळाचे पदाधिकारी व गणेश भक्तांचा उत्साह द्विगुणीत करण्यासाठी आणि त्यांच्या पाठीवर कौतूकाची थाप देण्यासाठी लातूर शहर भाजपाच्या वतीने गोलाई परिसरात स्वागत व्यासपीठ उभारण्यात आले होते. या व्यासपीठाने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले होते. विसर्जन मिरवणूकीत मानाचा पहिला गणपती भारतरत्न आझाद गणेश मंडळा गोलाई परिसरात आल्यानंतर या मंडळाच्या अध्यक्षांसह पदाधिकाजयांचे स्वागत भाजपकडून करण्यात आले. यानंतर बाप्पाची आरती करून या लाडक्या गणपतीला वाद्याच्या गजरात निरोप देण्यात आला. या नंतर सुरु झालेल्या विसर्जन मिरवणूकीत सहभागी झालेल्या प्रत्येक गणेश मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचा सत्कार शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते शाल, श्रीगणेशाची प्रतिमा व सन्मानचिन्ह देवून करण्यात आला. या व्यासपीठावर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्यासह माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, देविदास काळे, माजी स्थायी समिती सभापती शैलेश गोजमगुंडे, महिला मोर्चा अध्यक्षा रागिणी यादव, सरचिटणीस ॲड. दिग्वीजय काथवटे, रवि सुडे, मंडलाध्यक्ष विशाल हवा पाटील, राहूल भुतडा, सुरेश जाधव, सचिन सुरवसे,ॲड. ललित तोष्णीवाल, मधुसुदन पारीख,शिवसिंह सिसोदीया, स्वागत व्यासपीठ संयोजक किशन बडगिरे, प्रमोद गुडे, विनय जाकते, प्रविण कस्तुरे, विजय अवचारे, अजय भुमकर, ॲड. किशोर शिंदे, मुन्ना हाश्मी, बाबा गायकवाड, संजय गीर, रोहिणी देशमुख, सीमा करपे, ज्योती रसाळ, शोभा कोंडेकर, आफरीन खान, व्यंकटेश कुलकर्णी, किशोर जैन, अतिष कांबळे, संजय सुरवसे, नागोराव बोरगावकर, आकाश जाधव, राजकुमार गोजमगुंडे, संजय सुरवसे, गणेश गोजमगुंडे, जमिल शेख, अभिजीत मदने, सागर घोडके, सचिन मदने, गणेश कसबे,मोहम्मद शेख, महादेव कांगुले आदींसह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विसर्जन मिरवणूकीत सहभागी झालेले गणेश मंडळांचे पदाधिकारी व गणेशभक्तांवर फुलांची उधळण करत उत्साही वातावरण अधिक खुलविण्यास शहर जिल्हा भाजपाने मोठा हातभार लावला होता.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## कोण कुणाची मतं फोडणार?

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा सामना उद्या मंगळवारी रंगणार आहे. रालोआ आणि इंडिया आघाडी यापैकी कोण कुणावर भारी पडतो आणि कुणाची मतं फुटतात हे पाहणे मजेशीर ठरणार आहे. भाजपप्रणित रालोआने महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांना मैदानात उतरविले आहे, तर इंडिया आघाडीने बी सुदर्शन रेड्डी यांच्यावर डाव खेळला आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार मतदान करतात. संसदेच्या दोन्ही सभागृहातील संख्याबळ लक्षात घेता रालोआच्या उमेदवाराचा विजय जवळपास निश्चितच आहे. तरी, भाजपला सहज आणि सोप्या पद्धतीने मिळालेला विजय नको असतो.

चाणक्यनीती केवळ जिंकण्यात नाही, तर विरोधकांच्या पायाखालची जमीन ओढून विजय मिळविण्यात आहे. यामुळे भाजपचे चाणक्य शांत बसणार नाही. हातावर हात ठेवून शांत बसणे ही भाजपची संस्कृती नाही. इंडिया आघाडीच्या मतांमध्ये फूट पाडून उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक जास्त मतांनी कशी जिंकायची यासाठी भाजपची मंडळी सध्या कार्यरत आहे.

भाजप आणि मित्र पक्षांची मते फुटणार नाही शिवाय मते रद्द ठरू नये यासाठी भाजपने एकीकडे दिल्लीत तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित केली आहे. यात मतदान कसे करायचे आणि कोणत्या चुका टाळायच्या याचे प्रशिक्षण खासदारांना दिले जात आहे. भाजपाध्यक्ष जेपी नड्डा यांनी डिनरसुद्धा आयोजित केले आहे. काँग्रेससह इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या खासदारांना कशाप्रकारे फितुरी करायला लावायची याचे प्रयत्न सुरू आहेत. यासाठी भाजपने एका-एका केंद्रीय मंत्र्याला एका-एका राज्याची जबाबदारी दिली आहे. यात कोणता मंत्री कितपत यशस्वी होतो आणि कोण कोणत्या राज्यांतील विरोधकांच्या मतांना भगदाड पाडतो हे मंगळवारी रात्री स्पष्ट होईल.

सध्या दोन्ही आघाडीतील नेत्यांनी भावनिक डाव खेळला आहे. परंतु, हळूहळू एकमेकांची मते फोडण्याचे प्रयत्न केले जातील. भाजपने तामिळनाडूतील राधाकृष्णन यांना उमेदवारी देऊन द्रमुकला इंडिया आघाडीपासून वेगळे करण्याचा डाव खेळला आहे, तर तेलंगणातील रेड्डी यांच्या माध्यमातून काँग्रेसकडून रालोआचे घटक पक्ष तेलगु देसम पक्ष आणि वायएसआर यांना भाषेच्या आधारावर फोडण्याचा प्रयत्न करीत आहे.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे चिरंजीव आणि टीडीपीचे महासचिव नारा लोकेश यांनी एनडीए मजबूत असल्याची पोस्ट करून काँग्रेसच्या प्रयत्नांवर विरजण सोडण्याचा प्रयत्न केला आहे, तर डीएमकेने इंडिया आघाडीत असल्याची कबुली दिली आहे. रालोआने राधाकृष्णन यांना उमेदवारी देणे हा राजकीय डाव असून त्याकडे भाषेच्या दृष्टिकोनातून बघितले जाऊ नये असे म्हटले आहे. परंतु, काँग्रेस सतर्क आहे. बिहार निवडणुकीच्या तोंडावर आघाडीत फूट दिसून येणे काँग्रेसला परवडणारे नाही हे येथे उल्लेखनीय.

गेल्या महिन्यात जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे ही निवडणूक होत आहे. रिक्त झालेल्या उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. भाजप आणि विरोधकांनी दक्षिणेतील नेत्यांना उमेदवारी दिल्यामुळे मॅच रोमांचक झाली आहे. 'दक्षिण विरुद्ध दक्षिण' ही लढत अनेक निकषांवर मनोरंजक ठरणार आहे हे स्पष्ट आहे.

संवैधानिक व्यवस्था आणि आदर्श लोकशाहीत उपराष्ट्रपतींनी राजकीयदृष्ट्या तटस्थ राहणे अपेक्षित आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यासारख्या पदांची शपथ देखील या अर्थाने वेगळी आहे. त्यात, संविधानाप्रती निष्ठा यासारख्या इतर पैलूंसोबतच, संविधानाचे संरक्षण या मुद्द्यावरही भर देण्यात आला आहे. उपराष्ट्रपती हे केवळ एक महत्त्वाचे संवैधानिक पद नाही तर त्यांच्यावर राज्यसभा चालवण्याची जबाबदारी देखील आहे. अशा परिस्थितीत, राजकीय कारणांमुळे आणि कायदेविषयक अजेंड्यामुळे सत्ताधारी पक्षासाठी या पदाचे महत्त्व वाढते. सध्याच्या परिस्थितीकडे पाहता, या निवडणुकीचे महत्त्वही खूप वाढले आहे.

दोन्ही गटांच्या उमेदवारांकडे पाहिले तर, प्रत्येक पक्षाने अतिशय सावधगिरीने पावले उचलली आहेत. धनखड यांचा भाजपच्या मूळ विचारसरणीशी फारसा संबंध नव्हता आणि ते इतर पक्षांमधून भाजपमध्ये आले आणि पक्षाने त्यांच्या परंपरेविरुद्ध त्यांना एका सर्वोच्च संवैधानिक पदावर नियुक्त केले. मात्र, धनखड यांचा अनुभव आल्यानंतर भाजपची विचारसरणी जपणारे सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली आहे.

पुढील वर्षी तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यामुळे पक्षाला राजकीय संदेशही मिळेल. राज्यातील सत्ताधारी द्रमुक केंद्र सरकारबद्दल खूपच आक्रमक आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण, नीट परीक्षा, हिंदी भाषा आणि आर्थिक संसाधने आणि संभाव्य लोकसभा सीमांकन या मुद्द्यांवरून केंद्र आणि भाजपला कोंडीत पकडण्याची एकही संधी राज्य सरकारने सोडली नाही. सीमांकनाच्या मुद्द्यावर, इतर दक्षिणेकडील राज्यांनाही एकत्र आणण्याचे प्रयत्न केले गेले. अशा परिस्थितीत, राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती बनवून, भाजप अशा हल्ल्यांची धार बोथट करण्याचा प्रयत्न करेल.

भाजपच्या या रणनीतीला ओळखून, विरोधी गटाने दक्षिण भारतातील आपला उमेदवार उभा केला. याद्वारे त्यांनी दुहेरी रणनीती तयार केली आहे. एक म्हणजे दक्षिण विरुद्ध दक्षिण असा सामना करणे आणि तमिळ विरुद्ध तेलुगू सामना रंगवून एनडीएच्या सर्वात मोठ्या मित्र तेलुगू देसम पक्षाच्या समर्थनात अडथळा आणण्याचा प्रयत्न करणे. यामुळे राज्यसभेत एनडीएला अनेकदा पाठिंबा देणार्या जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षासाठीही पेच निर्माण होऊ शकतो. विरोधी गटाला चंद्राबाबू नायडू आणि रेड्डी यांच्याकडून पाठिंबा मिळण्याचे कोणतेही आश्वासन मिळाले नसले, तरी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या विधानांवरून हे स्पष्ट होते की विरोधी पक्ष तेलुगू ओळखीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करतील.तथापि, जर तेलुगू ओळखीच्या नावाखाली नायडू आणि रेड्डी यांच्यासाठी पेच निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला, तर द्रमुकचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन देखील तमिळ उमेदवाराला जोरदार विरोध करण्यासाठी कोंडीत सापडतील. या निवडणुकीद्वारे, विरोधी पक्ष गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर उदयास आलेल्या सरकारच्या कमकुवत बिंदूला दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. ही कमकुवतता म्हणजे संसदेत भाजपचा कमी झालेला पाया.मागील उपराष्ट्रपती निवडणुकीत लोकसभेत भाजपचे स्वतःचे ३०३ खासदार होते, परंतु २०२४ च्या निवडणुकीनंतर ही संख्या २४० पर्यंत खाली आली.दोनदा पूर्ण बहुमताने राज्य केल्यानंतर, भाजपला आघाडीतील भागीदारांवर अवलंबून राहून सरकार चालवावे लागत आहे. म्हणूनच, रेड्डी यांच्या माध्यमातून, भाजपच्या दक्षिणेकडील पैजांना तोंड देण्याची तसेच त्यांच्या राजकीय पाठिंब्याला धक्का देण्याची त्यांना आशा आहे.

# सेवानिवृतीच्या उंबरठ्यालगत 'टीईटी' ची सक्ती

## सक्तीच्या भक्तीत तरा नाहीतर घरचा रस्ता धरा

शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी भारत सरकार आणि राज्य सरकार गेल्या काही वर्षांपासून अनेक सुधारणा राबवत आहेत. शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी' चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे.

'टीईटी' परिक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय सेवेत राहू शकत नाही किंवा पदोन्नतीही मिळवू शकत नाही. अन्यथा सदर शिक्षकांना सेवानिवृत्ती स्वीकारावी लागेल. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची पात्रता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांना 'टीईटी' उत्तीर्ण होणे अपरिहार्य आहे. मात्र, बालशिक्षण हक्क कायदा २००९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक आणि पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना टीईटीतून वगळले आहे. राज्यात ५३ वर्षावरील अंदाजे १ लाख ४९ हजार शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांनी २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कार्यवाही करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महाराष्ट्रच नव्हे, तर उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

दुसरीकडे शिक्षकांमध्ये संभ्रम असून २५-३० वर्षांपासून शाळेत सेवा देणा-या आणि वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना ही परिस्थिती मोठी धक्का देणारी आहे. शिक्षकांच्या जीवनात निवृत्तीपूर्व काळ शांततेने घालवण्याचा असतो. पण आता ५३ वर्षे वय असलेल्या शिक्षकांसाठी 'टीईटी' मोठं आवाहन बनले आहे. त्यांच्या नातवंडांसोबतच त्यांनाही अभ्यास करून परीक्षा द्यावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय, शासनाने फक्त दोनच संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे.

या शाळांवर सुमारे ४.७९ लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वीच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने 'टीईटी' बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे शिक्षकांची पदोन्नती आता 'टीईटी' वरच आहे. शिक्षण सेवकांना ३ वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात. पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'टीईटी' ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी 'टीईटी' उत्तीर्ण असणारे ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. यामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता आणि नाराजी आहे. अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, दीर्घकाळ सेवा दिलेल्या शिक्षकांना अशा प्रकारे परीक्षा द्यायला लावणे अन्यायकारक आहे. तसेच, फक्त दोनच संधी देण्यात आल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही संघटनांनी या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

आता शासन त्यावर धोरण ठरवणार आहे. त्यानुसार परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम आणि मार्गदर्शक सूचना दिल्या जातील. परंतु शिक्षकांना भीती आहे की, वय झाल्यामुळे अभ्यास पुन्हा करणे कठीण जाईल. यामुळे अनेकांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागू शकते. अनेक शिक्षकांनी २५-३० वर्षे सेवा करून आता फक्त काहीच वर्षे निवृत्तीपर्यंत उरली आहेत. त्यांच्या मते, इतक्या वर्षांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करून अचानक परीक्षा लावणे अन्यायकारक आहे. शिक्षक संघटनांचा दावा आहे की, अनुभव आणि अध्यापन कौशल्यालाच महत्त्व द्यावे, केवळ टीईटीला नाही.

सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळेल. प्रत्येक शिक्षकाला पात्रता सिद्ध करावी लागेल. त्यामुळे भविष्यात शिक्षणाची पातळी उंचावेल. परंतु दुसरीकडे, अनुभवी शिक्षक नापास झाल्यास त्यांच्या जागी कमी अनुभव असलेले शिक्षक प्रमुख होतील, हा एक वेगळा धोका आहे. एकीकडे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल, पण दुसरीकडे वृद्ध शिक्षकांसाठी ही परीक्षा मोठं आवाहन ठरणार आहे. शासनाने याबाबत संतुलित निर्णय घेणे आणि शिक्षकांना योग्य मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

************

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# अमेरिकन टेनिसची नवी तारका

आर्यना सियारहिजेउना सबालेंका ही अमेरिकन ओपन टेनिसची यंदाची नवी तारका ठरली आहे. तिने नुकत्याच झालेल्या अंतिम सामन्यात अमांडा अनिसिमोव्हाला ६-३, ७-६ असा विजय मिळवला. आज सर्वात महान खेळाडू म्हणून ती ओळखली जाणार. सबालेंकाचे हे चौथे आणि या वर्षातील अखेरचे ग्रँडस्लॅम विजेतेपद होते. पण तिचा इथपर्यंतचा प्रवास निश्चितच वेदनादायक आणि खडतर होता. कारण अमेरिकन टेनिस ओपन विजेतेपद ही स्पर्धा हार्ड कोर्टवर खेळली जाते. त्यामुळे येथे प्रत्येक खेळाडूचा आणि त्याच्या शारीरिक क्षमतेचा कस लागतो. त्यातही ती महिला असेल तर जास्तच अवघड जाते. त्यामुळे अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकणे ही तशीही आगळीवेगळी बाब आहे. ती यंदा आर्यनाने करून दाखवली आणि तिचे हे चौथे ग्रँडस्लॅम विजेतेपद आहे. आर्यना हिने आता किम क्लिस्टर्स, आरांता विकारिओ, नाओमी ओसाका आणि हाना मँडलिकोवा यांच्याशी बरोबरी साधली आहे. विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करल्यावर त्याच खेळाडूवर म्हणजे अनिसिमोव्हाबरोबर खेळण्यासाठी ती उतरेल असे कुणालाही वाटले नव्हते. पण आर्यनाने ही जिद्द दाखवली आणि तिने विजयही मिळवून दाखवला. खरे तर हा सामना गुंतागुंतीचा होता. पण जेतेपद कायम राखण्याच्या इराद्याने मैदानात उतरलेल्याा आर्यना सबालेंका हिने पहिल्यापासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवलं. पहिला सेट ६-३ असा एकतर्फी आपल्या नावे केला. दुसऱ्या सेटमध्येही प्रतिस्पर्धी आणि पहिल्या ग्रँडस्लॅमसाठी खेळणाऱ्या अमांडा अनिसिमोव्हा हिने तिला टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी ती फिकी ठरली. हा सेट ७-६(३) असा जिंकत सबालेंकानं या स्पर्धे तील विजयी सिलसिला कायम ठेवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

आर्यनाने अंतिम सामन्यात ज्या पद्धतीने लढा दिला आणि तिच्या भावनांना हाताळण्यास ती सक्षम ठरली ती खरोखरच प्रशंसेस पात्र आहे. आर्यना ही जास्त निडर आणि स्पष्ट विचारांची आहे. आर्यना सबालेंकाने विम्बल्डनच्या पराभवाचा बदला घेतला आहे, असे आता टेनिस जगतात बोलले जाऊ लागले आहे. त्याबरोबरच बेलारूसच्या या सुंदरीच्या विजेतेपदाचे अनिसिमोव्हाचे विजेतेपदाचे स्वप्न धुळीस मिळवले. अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा प्रचंड पाठिंबा असतानाही त्याने विचलित न होता सबालेंका शांत आणि थंड डोक्याने खेळली. आपल्या घरच्या मैदानावर अनिसिमोव्हाला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत होता. पण सबालेंका शांत राहिली आणि थंड डोक्याने तिने आपले जोरदार फटके खेळले. विजेतेपद असेच घडत असतात. अगेन्स्ट ऑल ऑड्स जो विजय मिळवतो तोच खरा विजेता असतो. हे सबालेंकाने दाखवून दिले.

यूएस ओपन टेनिस हे हार्ड कोर्टवर खेळले जाते आणि त्यात मोठ्या सर्विस करणाऱ्यांना तितकेसे अनुकूल वातावरण नसते. याअर्थाने हार्ड कोर्ट हे विविध शैली असलेल्या आणि खेळण्याच्या वेगवेगळ्या स्टाईल्स असलेल्या खेळाडूंना उपयुक्त असते. या खेळातील सर्व्हिसचा वेग, चेंडूचा वेग आणि अनिश्चितता यावर मात करत सबालेंकाने विजय मिळवला हेच तिच्या विजयाचे वैशिष्ट्य. हार्ड कोर्ट हे टेनिसमधील सर्वात जलद सर्व्हिसचे माहेरघर मानले जाते. पण हार्ड कोर्टवर खेळताना खेळाडूंसाठी एक अत्यावश्यक बाब म्हणजे त्याचे शारीरिक चापल्य आणि मानसिक संतुलन. या दोन्ही बाबतीत आर्यनाने अप्रतिम कौशल्य दाखवले आणि विजय मिळवला. १८ वेळा ग्रँडस्लॅम विजेती राहिलेली मार्टिना नवरातिलोव्हा हिच्या मते सबालेंका हिने दाखवलेला संयम आणि तिची शक्ती हीच तिच्या विजयाची गुरूकिल्ली होती. अत्यंत दबाव असतानाही आर्यनाने ती टेनिसची चॅम्पियन आहे हे दाखवून दिले.


अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धा ही हार्ड कोर्टवरील सर्वात अवघड स्पर्धा समजली जाते पण तिच्या आव्हानांतच तिची ताकद समाविष्ट आहे. टेनिसमध्ये आज क्रिकेटइतकाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त पैसा आहे, कारण टेनिस हा खेळ आता प्रगत देशात खेळतात आणि भारतही त्यात मागे नाही. भारताचे विजय अमृतराज आणि लिअँडर पेस आणि महेश भूपथी यांनी देखील भारताचे नाव राखले. पण भारताच्या महिलांनी तशी शानदार कामगिरी केली नाही. पण त्यांना उत्तर अमेरिकन टेनिस खेळाडूंचे आहे. या खेळाडूंना पुरुषांइतकेच चापल्य आणि तंदुरुस्ती दाखवावी लागते. तेव्हा कुठे त्या यशस्वी होतात. ते या सर्व खेळाडूंनी केले आहे. आर्यना सबालेंका हिने अत्यंत गंभीर आव्हानांवर मात करत अमेरिकन ओपन टेनिसचे विजेतेपद जिंकले आहे. त्यात प्रथम होती खांद्याला झालेली दुखापत आणि त्यातून तिच्या सर्व्हिसवर परिणाम करणारे आरोग्याचे प्रश्न आणि त्याबरोबरच मानसिक आरोग्य सांभाळण्याची कसरतही करावी लागते.

कारण क्रिकेटप्रमाणेच टेनिस हाही खेळ शारीरिक कमी आणि मानसिकरीत्या जास्त ताकदीचा आहे आणि जो मानसिकदृष्ट्या प्रबळ असतो तोच विजेता होतो. या सर्वांवर मात करून आर्यना सबालेंकाने विजेतेपद मिळवले आणि तिच्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली. अजून सबालेंकाला बरीच मजल मारायची आहे. सबालेंकाने नुकतेच आपले वडील गमावले. त्या काळात ती मानसिकरीत्या पूर्णपणे ढासळली होती. त्यावर तिला मात करायची होती. त्यामुळे तिने सर्व संकटांवर मात करून अमेरिकन ओपनचे विजेतेपद मिळवले हे निश्चितच तिच्या प्रखर निर्धाराचे आणि विजेतेपदासाठी काहीही करण्याची तयारी दाखवून देते. कधीकधी आर्यना आपला संयम हरवते आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यावर संतापते. असे या वरच्या दर्जाच्या खेळाला चालत नाही. हा धडा ती शिकली आहे आणि काल ती ज्या संयमाने आपली टेनिसची रॅकेट फिरवत होती त्यावरून तिने या उणीवेवर मात केली आहे असे दिसते. या नव्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या तारकेला सलाम.

# नवी त्रिशक्ती

आपल्या जाचक अशा टॅरिफ धोरणाच्या निमित्ताने जगातील सर्वच अर्थव्यवस्थांना धारेवर धरणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष जीनपिंग यांच्या एकत्रीकरणाचा धसका घेतल्याचे दिसत आहे. चीनमध्ये झालेल्या एका सहकार्य परिषदेच्या निमित्ताने हे तीन नेते एकत्र आल्याने आणि त्यांची मोकळ्या वातावरणात विविध विषयांवर चर्चा झाल्याने ट्रम्प यांना दडपण येणे साहजिक आहे. त्यातच उत्तर कोरियाचे सर्वेसर्वा किम जोंग यांनीसुद्धा पुतीन यांच्याशी चर्चा केली.साहजिकच पुतीन आणि किम जोंग एकत्र येऊन अमेरिकेविरुद्ध कारस्थान करत आहेत, असे ताजे विधान ट्रम्प यांनी केले आहे.

सगळ्या जगाला सुधारण्याची आणि सगळ्या जगाला आर्थिक मदत देण्याची काळजी फक्त आपल्यालाच आहे, या भूमिकेतून आतापर्यंत अमेरिकेने जगाकडे पाहिले आहे. आर्थिक महासत्ता म्हणून जगातील विविध देशांनी आतापर्यंत अमेरिकेला आदर दिला आहे. पण ज्या प्रकारे ट्रम्प यांच्या ताज्या कारकिर्दीमध्ये जाचक टॅरिफ धोरणाच्या निमित्ताने सर्व जगातील अनेक अर्थव्यवस्था विस्कळीत करण्याचे काम सुरू आहे ते पाहता जगामध्ये जर नवीन मैत्रीसंबंध तयार होणार असतील तर त्याला ट्रम्प यांनी आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. भारत आणि रशिया यांच्यातील मैत्री काही नवीन नाही. उलट भारताने रशियाशी मैत्री कमी करून अमेरिकेशी मैत्री वाढवल्यावरून मोदी सरकारवर आधीपासूनच टीका होत होती.आता नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा रशिया बरोबरील मैत्रीसंबंध वाढवण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते.



भारताचा शेजारी असलेला आणि भारताचा प्रमुख शत्रू होऊ शकणारा चीन या देशाबरोबरही भारताचे संबंध कधीच सौहार्दपूर्ण नव्हते. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कालावधीमध्ये 'हिंदी चिनी भाई भाई' या धोरणाचा आणि त्यानंतर झालेला भारत-चीन युद्धाचा दाखला आजही दिला जातो. ते पाहता या दोन देशांमधील संबंध कधीच आदर्श नव्हते. कधी सीमावाद असेल किंवा कधी व्यापारयुद्ध असेल या निमित्ताने भारत आणि चीन यांच्यामध्ये नेहमीच संघर्षाची स्थिती होती. पाकिस्तानसारख्या भारताला त्रास देणार्या देशाच्या पाठीशी चीन उभा राहात असल्याबद्दलही भारताने अनेक वेळा नाराजी व्यक्त केली आहे. अशी परिस्थिती असताना भारत, चीन आणि रशिया हे तीन देश एकत्र येतात आणि उत्तर कोरियासारखा देशही त्यांना सहकार्य करतो हे ट्रम्प यांना पचणारे नाही.

भारत आणि चीनचा विचार करता त्या जगातील मोठ्या अर्थव्यवस्था आहेत हे नाकारून चालत नाही. जगातील जवळजवळ निम्मी लोकसंख्या या दोन देशांमध्येच राहते आणि एक मोठे मार्केट म्हणूनच या देशांकडे पाहिले जाते. त्यामुळे जर आपापसातील सर्व मतभेद विसरून भारत आणि चीन यांच्यासारखे मोठे देश एकत्र येत असतील आणि त्याला कारणीभूत अमेरिकेची टॅरिफ पॉलिसी ठरत असेल तर ट्रम्प यांच्या पोटात दुखणे साहजिकच आहे. अमेरिकेतील विविध राजनीतिज्ञ आणि मुत्सद्दी नेते सध्या ज्या प्रकारे भारत, चीन आणि रशिया हे तीन देश एकत्र येण्याच्या घटनेचे वर्णन करत आहेत ते पाहता त्यांनी ट्रम्प यांना इशारा देण्याचे काम केले आहे.

भारत हा जगातील प्रमुख लोकशाही देश आहे आणि या देशाचे अमेरिकेसारख्या लोकशाही देशाशीच चांगले संबंध राहू शकतात, रशिया किंवा चीन यासारख्या कम्युनिस्ट देशांबरोबर भारताचे पटणार नाही अशा प्रकारची विधाने काही अमेरिकन नेत्यांकडून करण्यात येऊ लागली आहेत. भारत आणि अमेरिका यांनी आपापसात चर्चा करून टॅरिफ पॉलिसीबाबत योग्य मार्ग काढावा अशाही सूचना काही अमेरिकन नेत्यांनी करायला सुरुवात केली आहे. भारत, चीन आणि रशिया या त्रिशक्तीची भीती वाटत असल्यामुळेच ट्रम्प प्रशासनाला त्याची दखल घ्यावी लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अशा प्रकारची मैत्री सातत्याने बदलणे मान्य केले जात नाही. पण ट्रम्प यांचे गेले काही महिन्यांतील निर्णय असेच वरवरचे आणि उथळ पद्धतीने घेण्यात आल्यामुळे जागतिक व्यवस्थाच अस्वस्थ आणि अस्थिर झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये जर अमेरिकेचा मैत्रीचा हात झिडकारून प्रत्येक देशाने नवे मित्र शोधायला सुरुवात केली तर त्यात चुकीचे काहीच नाही. भारत, चीन आणि रशिया यांच्यातील मैत्रीच्या नव्या अध्यायामुळे जगातील अनेक देशांना एक नवीन दिशा मिळणार आहे याची कल्पना ट्रम्प प्रशासनाला असल्यामुळेच त्यांनी याच त्रिशक्ती मैत्रीला आक्षेप घेण्यास सुरुवात केली आहे.

अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्धापासून राजकीय संघर्ष आहे. अमेरिका आणि चीन या दोन मोठ्या महासत्ता असल्यामुळे जागतिक वर्चस्वासाठी त्यांच्यामध्ये सुद्धा राजकीय संघर्ष आहे. या परिस्थितीत अमेरिकेकडे भारतासारखा मोठा देशच मैत्रीसाठी शिल्लक होता. पण भारतानेसुद्धा आता अमेरिकेकडे पाठ फिरवून रशिया आणि चीन यांच्याकडे मैत्रीचा हात दिला असेल तर अमेरिकेला आपल्या परराष्ट्रविषयक धोरणाचा पुनर्विचार करावा लागणार आहे.

भारत आणि रशिया यांच्यातील मैत्रीला निश्चित पुन्हा उजाळा मिळू शकतो. दुसरीकडे, भारत आणि चीन यांच्यातील मैत्री किती काळ टिकेल याबाबत शंका व्यक्त करण्यात येत असली, तरी सध्या भारत, रशिया, चीन या त्रिशक्तीचा धसका अमेरिकेसारख्या महासत्तेने घेतला आहे हे नाकारून चालणार नाही. ट्रम्प या नवीन मैत्रीला कसा प्रतिसाद देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# येवता जिल्हा परिषद गटातील गणेश असंख्य मंडळांनी सुरज घुले यांना दिला आरतीचा मान.

केज/प्रतिनिधी येवता जिल्हा परिषद गटातील गणेश असंख्य मंडळांनी सुरज घुले यांना आरतीचा मान दिला आहे,भाजपा युवा नेते सुरज घुले यांनी गणेश उत्सवा मध्ये येवता जिल्हा परिषद सर्कल मध्ये अनेक गावात जाऊन नागरिकांशी संवाद साधत गणेश मंडळांना भेट देत गणेश उत्सवात नवा उत्साह म्हणजेच सध्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका जवळ आल्या आहेत.त्या अनुषंगाने सुरज घुले यांचा गाव भेटी दौरा करून नागरिकांशी संवाद साधत आहेत घुले यांना या दौऱ्या दरम्यान नागरिकांच मोठा प्रतिसाद मिळत आहे. युवा नेते सुरज घुले यांनी यवतमाळ जिल्हा परिषद सर्कल मधून निवडणूक लढवावी असा आग्रह युवक वर्गातून केला जात आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. भक्ती, श्रद्धा, सामाजिक ऐक्य आणि उत्साहाचा अद्वितीय संगम घडवणारा हा उत्सव प्रत्येकाच्या हृदयात आनंदाचे नवे सूर छेडतो. याच उत्साहात भारतीय जनता पार्टीचे युवा नेते सुरज घुले यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह परिसरातील विविध गणेश मंडळांना भेटी देऊन उत्सवातील सहभागी भावनेला अधिक बळ देवुन नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेत नागरिकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत शासन स्तरावर पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचे घुले यांनी आश्वासित केले. सुरज घुले यांना मिळालेला आरतीचा सन्मान गावोगावी व शहरातील नामांकित गणेश मंडळांना भेट देताना मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी सुरज घुले यांना श्री गणेशाची पूजा व आरती करण्याचा सन्मान दिला. श्रद्धा, भक्ती व एकोप्याने भारलेला तो क्षण सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला फक्त उत्सवाला भेट देण्यापुरतेच मर्यादित न राहता सुरज यांनी गणेश मंडळांकडून राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, आरोग्यविषयक, पर्यावरणपूरक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी सहकार्य केले. त्यामुळे मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह स्थानिक तरुणांमध्ये उत्साहाची नवी लाट निर्माण झाली.ग्रामस्थांशी थेट संवाद, युवकांना प्रेरणा भेटीच्या दरम्यान सुरज यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न ऐकले, ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच तरुण



पिढीला एकत्र येऊन समाजकार्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या मनमोकळ्या संवादामुळे ग्रामस्थांना आपलेपणाची जाणीव झाली, तर युवकांना नव्या जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली. सर्वसमावेशक युवा नेतृत्वाची झलक गणेशोत्सवासारख्या सांस्कृतिक व धार्मिक उत्सवांमध्ये लोकांशी प्रत्यक्ष संपर्क साधत, सामाजिक बांधिलकी जोपासत व सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व ही आजच्या काळाची गरज आहे.युवा नेते सुरज घुले यांनी आपल्या सक्रिय उपस्थितीने व बांधिलकीने ही भूमिका अधिक ठळकपणे अधोरेखित केली आहे. गणेशोत्सव हा केवळ भक्तीचा नव्हे तर सामाजिक जागृतीचा उत्सव आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा युवा नेते सुरज घुले यांचे कार्य निश्चितच समाजाला प्रेरणा देणारे व भविष्यातील सर्वसमावेशक नेतृत्वाची दिशा दाखवणारे ठरले आहे. गणेशउत्सवा दरम्यान कानडी माळी, सबला, कोठी, लव्हूरी, टाकळी, डोणगाव, कदमवाडी, कोरेगाव, कासारी, कोल्हेवाडी, नागझरी यासह पंचक्रोशीतील अनेक गावांना सुरज घुले यांनी भेटी दिल्या आहेत.

# तुमच्या आतड्यांमध्ये साचलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ५ पदार्थ; पचनही सुधारेल, पोट राहील हलकं!

लहान आतडे आणि मोठे आतडे (Gut) हे आपल्या शरीराच्या पचनसंस्थेतील महत्त्वाचे अवयव आहेत. कारण– ते पचनसंस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. आपल्या अन्नातून निरोगी आणि पौष्टिक गोष्टींचे पचन करणे हे आतड्यांचे कार्य असते; पण शरीरातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्याचे कामही ते करतात. त्यामुळे निरोगी शरीरासाठी आतड्यांचे आरोग्य सुस्थितीत राखणे गरजेचे आहे. जर आतड्यांचे आरोग्य चांगले असेल, तर आपली रोगप्रतिकार शक्ती उत्तम राहते; पण अनेकदा आपण आतड्यांच्या आरोग्याकडे लक्ष देत नाही आणि आरोग्याच्या समस्या स्वत:हून अंगावर ओढवून घेतो. आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आता काय खावे, काय खाऊ नये याबाबत अनेक जण सजग आहेत. या पार्श्वभूमीवर आतड्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आपण कसे जेवावे हे माहीत असणेही गरजेचे आहे.

सध्या आतड्यांसंबंधीच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. आजच्या घडीला ही वाढ मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. कारण– बहुतांशी लोक घराबाहेरील अन्न अधिक प्रमाणात खाताना दिसून येतात आणि असे अन्न शरीरासाठी अत्यंत अपायकारक आणि घातकसुद्धा ठरत आहे. त्यामुळे आतड्यांचे आरोग्य वेगाने धोक्यात येत असल्याचे दिसून येते. त्याचसोबत मद्यपान आणि धूम्रपान यांमुळेही अशाच समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे चांगला आहार घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणते पदार्थ तुमच्या आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते, या विषयावर नवी दिल्ली येथील पोषणतज्ज्ञ कनिका नारंग यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण ती माहिती सविस्तर जाणून घेऊ.



निरोगी आतडे योग्य पचनाशी संबंधित आहे. जेव्हा आपले आतड्यांची स्थिती निरोगी असते तेव्हा वजन नियंत्रणात राखणे खूप चांगल्या प्रकारे शक्य होते. एकंदरीत आतड्यांचे आरोग्य चांगले राखणे अत्यंत गरजेचे आहे. तुमच्या रोजच्या आहारात काही आरोग्यदायी बदल करून, हे शक्य होऊ शकते.

आतड्यांमधील घाण पटकन काढून टाकतील हे ५ सुपरफूड्स

१. दही दही एक प्रो–बायोटिक आहार आहे, ज्यामध्ये आतड्यांसाठी अनुकूल जीवाणू असतात. दही आतड्यांतील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढविण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते. त्याचबरोबर अनारोग्यास कारणीभूत ठरणारे प्रतिकूल जीवाणू काढून टाकण्यासाठीही दही हा उत्तम स्रोत आहे. २. कच्ची केळी कच्ची केळी खाल्ल्याने आरोग्यदायी आंत मायक्रोबायोम वाढण्यास मदत होते. ते प्रतिरोधक स्टार्चने समृद्ध असतात आणि रक्तातील साखरेचे नियमन करू शकण्यासह इन्सुलिन संवेदनशीलता सुधारू शकतात.


३. अळशी विरघळणारे फायबर आणि ओमेगा –३ फॅटी ॲसिडस् यांनी समृद्ध असलेली अळशी आतड्यांची जळजळ कमी करते आणि हृदयाच्या आरोग्यास समर्थन देते. दररोज आपल्या आहारात एक–दोन चमचे अळशीचा समावेश करा. ४. ॲव्होकॅडो विरघळणाऱ्या फायबरव्यतिरिक्त यात निरोगी चरबी असते. त्यामुळे पोषक शोषण क्षमता सुधारते आणि निरोगी आतड्यांतील मायक्रोबायोमला समर्थन देते. दिवसाकाठी अर्धा ॲव्होकॅडो चांगला आहे.

५. ग्लुटेनमुक्त ओट्स ग्लुटेनमुक्त ओट्स हा विरघळणाऱ्या फायबरचा चांगला स्रोत आहे आणि त्यामुळे आतड्यांच्या आरोग्यास मदत मिळते.

तसेच त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होऊन, हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन लाभते. दररोज ३० ग्रॅम (एक वाटी) शिजविलेले ग्लुटेनमुक्त ओट्स सेवन करण्याचे लक्ष्य ठेवा.

## मीही होतो पँथर !

पँथरच्या पुढार्याने केलं
छू... जा मंतर
पण शिक्षणाला केलं नाही अंतर
नोकरी लागली तदनंतर
तरीही...
सामाजीक कार्यात राहीलो
निरंतर...
ऊपजीविकेसाठी कुणा पुढेही
झुकलो नाही
भडवेगीरी,दलालीही केली नाही
स्वाभिमानाने जगलो
निडरतेने वागलो
अजुनही तोच स्वाभिमान
घेऊन जगतो आहे
चळवळीत बेडरतेने
वागतो आहे
चळवळीतील भाडखाऊ दलाला
गांवा गावातील गल्ली बोळात
शहराच्या चौका–चौकात तर
पान टपरीपासुन हाटेलात
बघतो आहे
स्वाभिमान नसलेल्या
भाडखाऊ,दलालांना
शब्दास्त्राने टोकतो आहे
प्रस्थापितांच्या दावणीत
झेपावणार्या तरुणांना
रोकतो आहे आणि
त्यांच्यकडून केल्या जाणार्या
विनाकरणच्या बदनामीला
भोगतो आहे
अशा प्रकारची बदनामी
करणार्यां मुर्खांच्या
बुध्दीची कीव वाटते
पण..
समाजात पुढार्यांचा बुरखा पांघरुन
वावरातील ऊभ्या पिकात बेशरमपणे
डोलणार्या कुल्डूची
व गाजर गवताचे हसु येते
का ? तर...
समाजात जसे प्रबोधानाचे
कार्यक्रम राबवून ही
फुले,शाहू,आंबेडकरांच्या
क्रांतीकारी विचाराने
समाजात क्रांतीकारी स्वाभिमान
रुजत नाही
जसे की...
वावरात तन नाशक फवारुनही
कुल्डू आणि गांजर गवत
नष्ट होत नाही.
हे सारं खुले आम चालणारं
माझ्या सारख्याला पहावत नाही
पण बरेच असे बुध्दीजीवी
अहेत की ते..हे सारं पाहुन
बहुतेच
भाडखाऊ,दलालांच्या
प्रबोधान संकल्पीत
बुरख्याखाली
पांघरलेल्या
कार्यक्रमात
ऊदघाटक,वक्ता,प्रमुख
मार्गदर्शक म्हणुन
सहभाग नोंदवतात
त्या निमीत्ताने
त्याचेकडून
आपली पाठ थोपटून
घेतात व
कार्यच्रमात त्याची पाठ थोपटतात
यातील एक जन ऊपजीविकेसाठी तर
दुसरा
प्रसिध्दीसाठी
एक–मेकांना धोपटतात
या कार्यक्रमाच्या शक्ती पत्रप्रदर्शनाने
प्रस्थापीत राजकारणी
या भाडखाऊ,दलाललाना
राजकीय फायद्यासाठी चाचपडतात
आणि
राजसत्ता हडपडतात.
प्रस्थापितांच्या राजसत्तेपुढे
चळवळीतील बहुतेक सारे
भाडखाऊ,लुबडबुतात.



**********
संपादक–साप्ता.शोषित लोकलढ
संस्थापक–भारतीय संविधान क्रांतीदल
प्रा.एस.पी.हिवाळे. मो. नं.
९८५०४११३२३

# बुद्ध - बाबासाहेबांचे तळमळतेने कार्य करणारा कार्यकर्ता जर कोण ? असेल तर ते आहेत कल्याणराव हनवते - उत्तमराव तरकसे ( कवी, साहित्यिक )

लॉर्ड बुद्धा पार्क येथे विनामूल्य दाखवण्यात येणारा व्यसनमुक्त लघु चित्रपट सिनेमा पावसामुळे रद्द, व्यसनमुक्त, मोबाईलचे दुष्परिणाम सिनेमा पुढील कार्यक्रमात दाखविणार..! व्यसनमुक्त भारत अभियान राबविणार..!!
–– जितेंद्र मुंडकर (डायरेक्टर)





नवी मुंबई / के. एच. हनवते :– ज्वेल ऑफ नवी मुंबई – लॉर्ड बुद्धा पार्क येथे ७ सप्टेंबर रोजी भाद्रपद पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम तथागत भगवान गौतम बुद्धांच्या भव्य दिव्य मूर्तीला मेणबत्ती अगरबत्ती दीपप्रज्वलन व सुगंधित पुष्प वाहून सर्व उपस्थितांनी सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण केले या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक, शिक्षीका आणि बौद्धाचार्य हे अधिक संख्येने उपस्थित होते, यावेळी या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित कवी साहित्यिक : उत्तमराव तरकसे यांनी लॉर्ड बुद्धा पार्क येथील कार्यक्रमस्थळी सदिच्छा भेट देण्यासाठी आले असतात त्यांनी शुभेच्छा पर बोलताना वरील उद्गार काढले. ते पुढे असेही म्हणाले की हनवते हे कुणाकडूनही कसलीही अपेक्षा न करता स्वतःला कार्यात झोकून घेतलेला आणि तळमळतेने बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार अधिक जोमाणे दिवस रात्र कार्य करणारा जर कार्यकर्ता कोण ? असेल तर ते म्हणजे स्वाभिमानी भीमसैनिक, महावृत्त दैनिक पत्रकार : कल्याणराव हनवते यांचं नाव अग्रणीय आहे. मी त्यांना गेली सात वर्षापासून पाहत आलो आहे ते सतत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तळमळतेने धडपड करतात मग राजकारण असो की धम्मकारन स्वतःला त्यांनी समाजकार्यात वाहून घेतलेला सच्चा आणि प्रमाणीक कार्यकर्ता आहे च्या कार्यकर्त्याला आपण सर्वांनी आपल्याकडून जे काय सहकार्य करता येईल ते केले तर नक्कीच त्यांच्या हातून पुढील चांगले कार्य होणार आहे. या भव्यदिव्य शांती वनात प्रत्येक महिन्यातील पौर्णिमा साजरी करण्याचा जो संकल्प त्यांनी केलेला आहे तो खरंच वाखण्याजोगा निर्णय आहे त्यांच्या मंगलमय कार्याला आणि उपस्थित बोध उपासक, उपासिकांना आजच्या भाद्रपद पौर्णिमेच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित व्यसनमुक्त भारत अभियान राबविणारे : जितेंद्र मुंडकर सर यांनी या कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सर्वांना आश्वासित केले की, पावसाचे प्रमाण खूपच जास्त असल्यामुळे आपण पुढील कार्यक्रमात व्यसनमुक्त आणि मोबाईलचे दुष्परिणाम हा लघु चित्रपट सिनेमा नेक्स्ट कार्यक्रमांमध्ये नक्कीच दाखवणार आहोत असे जाहीर केले. भाद्रपद पौर्णिमेचे महत्व या विषयावर भारतीय बौद्ध महासभा नेरुळ शाखा अध्यक्ष : कविता कांबळे यांनी सविस्तर माहिती दिली या कार्यक्रमात कविता कांबळे, माला ताई मेश्राम यांच्या वतीने खीरदान वाटप केली. पंचशील सामाजिक संस्था महिला अध्यक्ष: शालिनी ताई औचर, वत्सला ताई खरा, रूपा सोनवणे, विशाखा चव्हाण, संध्या बिपीन उबाळे, माया राक्षे, राधा खरात, संगीता सुहास कांबळे, कांचन गाडे, नीलम पवार, उज्वला जाधव, सुरेखा कांबळे, मालन गायकवाड, नंदा परूळेकर, विद्या अंभोरे, वर्षा साखरे इत्यादी महिला अधिक संख्येने उपस्थित, होत्या, लहान थोर, बालक, बालिका यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून तथागत भगवान गौतम बुद्धांच्या भव्यदिव्य मूर्तीला त्रिवार वंदन केले. शेवटी सरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मराठा आरक्षणासंदर्भातील जीआरमुळे ओबीसी समाजाचे अस्तित्व धोक्यात!

मुंबई: राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या जीआर मध्ये पात्र असा शब्द वापरला होता. पण दुसरा जीआर काढताना मात्र पात्र हा शब्द वगळण्यात आला. याचा अर्थ असा निघतो की मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण मिळू शकते. हा ओबीसी समाजावर अन्याय आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध ओबीसी संघटनाद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत ही भूमिका मांडण्यात आली. मराठा आरक्षणसंबंधात ओबीसी नेते महाराष्ट्रात अनेक बैठका घेत आहेत आणि काही दिवसांतच ते न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार हे राज्यभरातील ओबीसी नेतृत्वाची भेट घेत आहेत. जर सध्याचे महायुती सरकार ओबीसी समुदायाचे नुकसान करणारे कृत्य करत असेल, तर आता आपल्याला लढावे लागेल आणि आपल्या हक्कांचे रक्षण करावे लागेल. या सरकारच्या ओबीसी विरोधी भूमिकेचा तीव्र विरोध केला पाहिजे, असे माजी मंत्री वडेट्टीवार म्हणाले.

मुंबईत उर्वरित महाराष्ट्रातील सकल ओबीसी संघटनांच्या बैठकीचे आज आयोजन करण्यात आले होते. शनिवारी विदर्भातील ओबीसी संघटनांची बैठक नागपुरात पार पडली होती. आजच्या बैठकीला मार्गदर्शन करीत असताना विजय वडेट्टीवार म्हणाले आरक्षण हा सगळ्यांचा अधिकार आहे. ज्यांच्याकडे नोंदी आहेत त्यांना आमचा विरोध नाही पण सरसकट आरक्षण देणे हे योग्य नाही. सरकारने काढलेल्या जीआरने मूळ ओबीसींच्या हक्कावर गदा येणार आहे.

## संपूर्ण साक्षरताच मानवी मुल्यांची जपणूक करेल -डॉ. वसुदेव गायकवाड

केज/प्रतिनिधी दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आला. व्याख्याते म्हणून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले. संपूर्ण साक्षरताच मानवी मुल्यांची जपणूक करेल असे प्रतिपादन डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केले. संपूर्ण जगातील संपूर्ण मानवी समाज १००टक्के साक्षर झाला पाहिजे. साक्षरता हिच खरी मानवी शक्ती आणि ताकद आहे. म्हणून संपूर्ण विश्वातील मानवी समुह १०० % साक्षर झाला पाहिजे आणि प्रत्येक व्यक्तीने कामाच्या वाचना बरोबरच सार्वजनिक गंथालयातील ग्रंथांचे अवांतर वाचनही केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. वसुदेव(बप्पा) गायकवाड यांनी केले. अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते. प्रमुख अतिथी म्हणून रावसाहेब जाधव,, नारायणभाऊ



गायकवाड, आरुण गायकवाड, रविंद्र गायकवाड ( पेंटर), बबन पुंड, यांची उपस्थिती होती. यावेळी कृष्णा गायकवाड, विजय गायकवाड, एस. के. वैरागे, दादासाहेब गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, शिवम गायकवाड, संजय सोनवणे यांच्यासह वाचक, हितचिंतक यांची उपस्थिती होती. दिनांक ५ सप्टेंबर २०२ ५ रोजी शिक्षक दिन. अर्थात डॉ. सर्वोपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम डॉ. सर्वोपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून वंदन करण्यात आले. अत्यंत साधेपणाने शिक्षकदिन साजरा करण्यात आला. दोन्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे विश्वस्त आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील सरांना दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ प्रदान प्राचार्य विष्णुपंत रसाळ सरांवर सर्वस्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

बीड/प्रतिनिधी बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील डॉ. पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत सूर्यभानराव रसाळ पाटील सर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था( संघ) नाशिकच्या वतीने दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील डॉ. पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत सूर्यभानराव रसाळ पाटील सर बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना मराठवाडा सहसचिव तसेच गणित अध्यापक मंडळ जिल्हा बीडचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील काम उल्लेखनीय आहे. यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल व घेतलेल्या अथक परिश्रमाची दखल घेऊन त्यांना शिक्षक दिनानिमित्ताने नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था( संघ) नाशिकच्या वतीने दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. या पुरस्काराचे एका भव्य दिव्य कार्यक्रमात रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी माजी न्यायमूर्ती दिपकजी ढोलकिया, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ . महेंद्र देशपांडे यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य विष्णुपंत सुभानराव रसाळ पाटील सर यांचे संघर्ष योद्धा मराठा हृदयसम्राट मा. मनोजदादा जरांगे पाटील यांनी अभिनंदन केले. तसेच पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष पूर्णवादभूषण लक्ष्मीकांतरावजी पारनेरकर, जीवन कला मंडळ बीडचे अध्यक्ष मा. गंगाधररावजी आगलावे , सचिव गणेशराव जहागीरदार , कार्याध्यक्ष अशोकराव महाजन ,उपाध्यक्ष महादेवराव हुलजुते ,सहसचिव द्वारकादासराव कुलकर्णी ,कोषाध्यक्ष मुरलीधरराव देशपांडे ,संचालक अरुणराव कुंडलकर सर ( महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक) व सर्व संचालक, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा बीड जिल्हा अध्यक्ष प्राचार्य पैठणे जे .एम .( महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक ), मराठवाडा मुख्याध्यापक संघ उपाध्यक्ष नामदेवराव सोनवणे सर (मराठवाडा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना ), दत्ताजीराव पवार सर राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षकसेना , शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिया राणी पाटील मॅडम , उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे साहेब,अधीक्षक अजय बहिर साहेब ,खटावकर साहेब , लेखाधिकारी थोरात साहेब, गणित मंडळाचे जिल्हा सचिव मुख्याध्यापक बन्सी हावळे , सेवानिवृत्त प्राचार्य रामहरी कदम मामा , माजी मुख्याध्यापक लक्ष्मणराव इंगोले सर, शिक्षक सेना खाजगी विभाग बीड जिल्हा अध्यक्ष गौतम चक्रे सर, सचिव सतीश रसाळ सर, शिक्षकसेना जिल्हा परिषद विभाग बीड जिल्हा मा .अध्यक्ष दिलीप डावकर सर , अध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर व सर्व पदाधिकारी आणि मांजरसुंबा येथील सरपंच सौ.मनीषाताई रसाळ उपसरपंच शेख अजिज व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच शालेय समिती सदस्य धर्मराज रसाळ सर ( जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ) , माजी सरपंच आश्रुबाराव रसाळ , गोरक्षदादा रसाळ ,सुग्रीवजी रसाळ , अरुणकाका रसाळ , संपादक जगदिशराव पिंगळे, गंगाधर नाना काळकुटे, माजी विद्यार्थी माने अशोक ( नाशिक) यांच्यासह मांजरसुंबा आणि मांजरसुंबा पंचक्रोशीतील सर्व गावातील सरपंच , उपसरपंच, सदस्य ,पालक आणि शाळेतील सर्व शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी यांनी केले. पुरस्कार मिळाल्याबद्दल सध्या त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सराईत गुन्हेगार अजिंक्य निळकंठ मुळे व टोळी विरुध्द मोक्का कायद्यान्वये कारवाई

लातूर :- सराईत गुन्हेगार अजिंक्य निळकंठ मुळे व टोळी विरुध्द मोक्का कायद्यान्वये कारवाई* या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,, दि.११/०३/२०२५ रोजी १६.०० वाजताचे सुमारास अंबाजोगाई रोडवरील राजश्री बार व त्यासमोरील रोडवर आरोपी नामे अजिक्य निळकंठ मुळे, बालाजी राजेंद्र जगताप, अक्षय माधवराव कांबळे,प्रणव प्रकाश संदीकर,साहिल रशीद पठाण, नितीन शिवदास भालके, विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी फिर्यादी अजय बाबासाहेब चिंचोले यास राजश्री बारमध्ये दारु पिल्यानंतरचे बिल दे म्हणून पैशाची मागणी केली त्यावेळी फिर्यादी यांनी सदर आरोपीतांना बिल देण्यास नकार दिला असता नमुद आरोपीतांनी व विधीसंघर्षग्रस्त बालकाने फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याचे उददेशाने चाकु, लोखंडी कत्ती, लोखंडी रॉड व बियरची बाटलीने मारहाण, करून फिर्यादीचे अंगावरील शर्ट काढुन फिर्यादीस अर्धनग्न करुन सार्वजनिक रोडवरून फरफटत ओढून फिर्यादीचे पॅन्टचे खिशातील २,२००/- रूपये जबरदस्तीने काढून घेतल्याने पो.स्टे. शिवाजी नगर लातूर येथे गुरनं.८७/२०२५ कलम १०९(१), ३०८(५). ३११, भारतीय न्याय संहिता-२०२३, सहकलम ०४, २५ शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे दिनांक १२/०३/२०२५ रोजी ०२.२१ वाजता गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हयातील आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाचे वडील यांचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेले हत्यार चाकु, लोखंडी कत्ती, लोखंडी रॉड व रोख रक्कम २१००/- रुपये जप्त करण्यात आले आहेत. आरोपी नामे अजिक्य निळकंठ मुळे, बालाजी राजेंद्र जगताप, अक्षय माधवराव कांबळे, प्रणय प्रकाश संदीकर, साहिल रशीद पठाण यांना अटक करुन व विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेवुन त्यांचे गुन्हेगारी पार्श्वभुमीबाबत अधिक माहीती काढली असता त्यांचेविरुध्द लातूर शहरात हिंसाचाराचा वापर करून, त्यांचे आर्थिक लाभाकरीता प्राणघातक हत्यारांनी सज्ज होवुन जबर दुखापत करून दरोडा टाकणे, दरोडा घालण्याची पूर्व तयारी करणे, जबरी चोरी करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन घातक हत्याराने जबर दुखापत करणे इत्यादी गंभीर स्वरुपाचे २५ गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नमुद आरोपीताविरुध्द मा. विशेष पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परीक्षेत्र नांदेड यांच्या परवानगीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कलमवाढ करण्यात आलेली होती. मोक्का कायद्याचे कलमवाढ केल्यानंतर आरोपी क्र.१ व आरोपी क्र.३ ते ६ यांचेविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३ (१) (ळळ), ३(२), ३(४) अन्वये गुन्हयाचे २४०३ पानाचे दोषारोप पत्र मा. विशेष मोक्का न्यायालय लातूर येथे दाखल करण्याची मंजुरी मा. अपर पोलीस महासंचालक (कावसु) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून घेण्यात आलेली आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधिक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात रणजित सावंत, समीरसिह साळवे, उपविपोअ, लातूर शहर, यांचे नेतृत्वात करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास समीरसिंह साळवे उपविपोअ, लातूर शहर यांनी केला आहे, प्राथमिक तपास पोउपनि हनुमंत कवले यांनी केला आहे. गुन्ह्याच्या तपास कामात मदत पोलिस अंमलदार /वाजीद चिकले, धैर्यशील मुळे, पांडुरंग सगरे, मोहन सुरवसे यांनी केलेली आहे.

## साहित्यिक उत्तम तरकसे हे साने गुरुजी माऊली रत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

मुंबई प्रतिनिधी :- मैत्री संस्था मराठी साहित्य व कला सेवा यांचे वतीने आई विषयावर निमंत्रित कवीचे कवी संमेलन व श्यामची आई कौतुक सोहळा धडक कामगार युनियन कार्यालय आरे कॉलनी गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील सभागृहात आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात मा. आनंदाताई राणे डॉ. संदीप नेमळेकर, डॉ राजू राम, मा. मंगलाताई परब, मा अभिजीत राणे, समाजसेवक सुरज भोईर हे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विचार मंचावर उपस्थित असून विशेष अतिथी म्हणून ( महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत ) उत्तमराव तरकसे (असारडोहकर) हे सदर कार्यक्रमास विशेष अतिथी व सदर संस्थेच्या वतीने त्यांना साने गुरुजी माऊली रत्न समाजभूषण पुरस्कार २०२५ पुरस्कार मान्यवराच्या हास्ते श्री उत्तम तरकसे यांना प्रधान करून त्यांना शाल व श्रीफळ पुष्पकच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. कवी गुरुदत्त वाकदेवकर यांनी खूप सुंदर सादरीकरण



केले कार्यक्रमास मुंबई व मुंबई उपनगरातून साहित्यिक व साहित्य रशिक तसेच सुज्ञ नागरिकांनी सभागृह अगदी खचून भरले होते उपस्थित प्रमुख पाहुणे, साहित्यिक व साहित्य रशिक त श्रुतेगण व सुज्ञ नागरिकांचे सुरज भोईर यांनीआभार मानत कार्यक्रमाची सुरुवात संविधान पूजनाने करून कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## राज्याच्या युवा धोरण समितीत लातूरच्या विधी पळसापुरे यांची वर्णी

लातूर : महाराष्ट्र सरकारने राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी समिती गठीत केली असून या समितीत राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त विशेषतः लातूरच्या कन्या विधी सुभाष पळसापुरे यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे त्या समितीतील सर्वात युवा सदस्य ठरल्या आहेत. राज्यातील युवकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे समाधान, त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक दिशा आणि शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी युवा धोरण महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या समितीचे कार्य अत्यंत जबाबदारीचे असून युवकांच्या भविष्यास दिशा देणारे आहे. बदलत्या काळातील आव्हानांचा विचार करून शिक्षण, रोजगार, क्रीडा, संस्कृती, सामाजिक सहभाग आणि उद्योजकता यांसारख्या विविध क्षेत्रांत युवा धोरणाचा आराखडा तयार करण्याचे काम ही समिती करणार आहे. विधी पळसापुरे या मागील पाच वर्षांपासून युवक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाकडून त्यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या संसदेत केलेल्या प्रभावी भाषणाने लाखो लोकांची मने जिंकली होती. त्यामुळे त्यांचा या समितीतील समावेश हा केवळ सन्मानच नव्हे, तर युवकांचा खरा आवाज या समितीत पोहोचेल, अशी खात्री दिलासा देणारी ठरते. लातूरपासून सुरू झालेला प्रवास थेट दिल्लीपर्यंत पोहचला आणि दिल्लीतून सुरू झालेला प्रवास आज देशभर पसरला आहे. दिसायला सोपा वाटणारा हा प्रवास प्रत्यक्षात मेहनत, संघर्ष आणि जिद्दीने सजलेला आहे. वाचन, लेखन आणि प्रभावी वक्तृत्व यांचा मिलाफ झाल्यावर एखादी व्यक्ती किती उंच भरारी घेऊ शकते याचे जिवंत उदाहरण म्हणजे विधी पळसापुरे, आपल्या बुलंद आवाजातून संसद गाजवणाऱ्या आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय



कार्य करणाऱ्या विधीने अगदी कमी वयात राष्ट्रीय युवा पुरस्कार पटकावला. तिच्या कविता, भाषणं आणि लिखाण हे सोशल मीडियावर हजारो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.यश म्हणजे फक्त स्वतःचं करिअर घडवणं नसून, अनेकांना मार्ग दाखवणं, प्रेरणा देणं आणि समाजासाठी काहीतरी घडवणं हेच खरं यश आहे. आणि याच प्रवासाचा पुढचा टप्पा म्हणजेच महाराष्ट्र सरकारच्या सुधारित युवा धोरण समितीत सर्वात युवा सदस्य म्हणून त्यांची झालेली निवड.गल्लीपासून दिल्लीपर्यंत नाव पोहोचलेली ही तरुणी आता राज्याच्या धोरणनिर्मितीत आपला ठसा उमटवणार आहे. त्यामुळे तिच्या पुढील वाटचालीकडून अजून मोठ्या शिखरांच्या अपेक्षा बाळगल्या जात आहेत.

## राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा गोर सेना तालुकाध्यक्ष विकास रामधन चव्हाण

रेणापूर(प्रतिनिधी)दि.प्रतिनिधी हैद्राबाद गॅझेट लागु करून मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा रूपचंद नगर येथील रेणापुर तालुका अध्यक्ष विकास रामधन चव्हाण यांनी दिला आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सचीन राठोड यांनी असे म्हटले आहे की१९१८साली हैद्राबाद संस्थान अस्तित्वात असताना मराठवाडा आणि अन्य भाग हा हैद्राबाद संस्थाना मध्ये समाविष्ट होता. हैद्राबाद संस्थानातील बंजारा समाज हा अनुसूचित जाती मध्ये समाविष्ट आहे.तेलंगणा आणि कर्नाटक राज्यातील बंजारा समाज हा एस टी प्रवर्गात



आहे. आणि महाराष्ट्रात व्हिजेएनटीतगछ्छमध्ये अशा प्रकारचा भेदभाव केला गेला आहे. तेलगंना,कर्नाटक आणि आंध्रप्रदेश मधील बंजारा समाजाची सामाजिक,शैक्षणिक, आर्थिक व भौगोलिक वाईट परिस्थिती जशी आहे.तशीच परिस्थिती महाराष्ट्रातील बंजारा समाजाची किंबहुना त्या पेक्षा हलाखीची परिस्थिती आहे. देशातील बंजारा समाजाची एकच बोलीभाषा,एकच पेहराव आणि एकच संस्कृती असताना सुद्धा वेगवेगळ्या राज्यां मध्ये वेगवेगळं आरक्षण दिले गेले आहे.त्या मुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजावर सरळ सरळ अन्याय आहे. हैद्राबाद गॅझेट मध्ये समाजाच्या सामाजिक बंजारा मागासलेपणाचा,बोली भाषा,संस्कृती आणि भौगोलिक बाबींचा उल्लेख केला गेला आहे. त्यामुळे राज्य सरकारने हैद्राबाद गॅझेट तात्काळ लागू करुन मराठवाड्यातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करावा या न्याय मागणीसाठी बंजारा व्यापक आंदोलन छेडणार आहे. असे रेणापुर येथील विकास रामधन चव्हाण यांनी म्हटले आहे.

## लातूरमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी समितीची बैठक

लातूर(जिमाका)दि.महाराष्ट्र मोटार वाहन(स्कूल बस करीता विनियम)नियम२०११च्या अधिसूचने नुसार,शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकी बाबत आढावा घेण्यासाठी आणि नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक झाली. या बैठकीला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक अश्वजित जानराव,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर,उपविभागीय पोलीस अधिकारी(शहर)एस.डी.साळवे,वाहतूक नियंत्रण शाखेचे विठ्ठल दराडे तसेच शिक्षण विभाग आणि लातूर महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शालेय परिवहन समिती आणि शाळा प्रशासनाला सर्व शालेय वाहनांची वाहन योग्यता प्रमाणपत्र,विमा,परवाना,पीयुसी,चालक अनुज्ञप्ती आदी कागदपत्रे वैध असल्याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले.तसेच,सर्व वाहनांवर स्पीड गव्हर्नर कार्यान्वित असल्याची तपासणी करावी.वैध कागदपत्रे नसलेली किंवा स्पीड गव्हर्नर नसलेली वाहने विद्यार्थी वाहतुकीसाठी वापरू नयेत,याची दक्षता घ्यावी,अशा सूचना देण्यात आल्या. अवैधरित्या विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांना मज्ज़ाव करून त्यांची माहिती परिवहन विभाग आणि पोलीस प्रशासनाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.अशा वाहतुकीत सहभागी शाळांवर शिक्षण विभागाने कारवाई करून अहवाल सादर करावा,असे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

## मनपाच्या कलशात साडे चार टन निर्माल्याचे दान !

### १७ हजार गणेश मूर्तींचेही संकलन १३२ सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन

लातूर/प्रतिनिधी:जल प्रदूषण टाळण्यासाठी मनपाच्या वतीने राबविण्यात आलेल्या गणेश मूर्ती संकलन उपक्रमा अंतर्गत शहरातून जवळपास १७६६३ गणेश मूर्ती संकलित करण्यात आल्या.या सोबतच यंदा निर्माल्य संकलनासाठी पालिकेने ठेवलेल्या कलशामध्ये गणेशभक्तांनी ४३२० किलो निर्माल्याचे दान केले.या निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाणार आहे.





परंपरेप्रमाणे गणेश मूर्तींचे जलाशयात विसर्जन केले जाते. मूर्तीसोबत निर्माल्यही पाण्यात टाकले जाते. यामुळे जलस्त्रोत प्रदूषित होतात.ते टाळण्यासाठी मनपा घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळाकडूनही मूर्ती संकलित करते.या सर्व मूर्तींचे नंतर बारा नंबर पाटी परिसरातील खाणी मध्ये विधिवत विसर्जन केले जाते.

या उपक्रमा अंतर्गत पालिकेने यावर्षी शहरात १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारली होती.त्यासाठी जवळपास ४३० अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले होते.या केंद्रावर गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले. मूर्ती सोबतच भक्तांना निर्माल्य टाकता यावे यासाठी कलशही ठेवण्यात आले होते.या कलशांमध्ये ४३२० किलो निर्माल्य संकलित झाले. तसेच १२ नंबर येथील खदाणी मध्ये १३२ सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.

निर्माल्य संकलनासाठी ठेवलेल्या कलशात जमा झालेल्या निर्माल्यापासून मनपा खत तयार करणार आहे.शहरातील गणेश भक्तांनी मनपाच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या घरातील गणेश मूर्ती संकलन केंद्रात जमा केल्या.याबद्दल मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील नागरिक व सार्वजनिक गणेश मंडळाचे आभार मानले आहेत.

## रमाई आवास योजनेचे अनुदान जमा करण्यात येत आहे लाभधारकांनी प्रस्ताव सादर करण्याचे मनपाचे आवाहन.

लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेची देयके लाभधारकांना ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार आहेत.




राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी रमाई घरकुल योजना मनपाच्या वतीने राबविण्यात येते. या योजनेमध्ये शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील ज्या व्यक्तींना स्वतःचे घर नाही त्यांना घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. शासनाच्या वतीने २५० लक्ष रुपयांचे अनुदान अशा घटकांना मिळते.योजनेनुसार घरकुलाचे बांधकाम संबंधित व्यक्तीने स्वतः करावयाचे असून शासनाकडून तीन टप्प्यात रक्कम वितरित करण्यात येते. या रकमेतून लाभधारकास ३० चौरस मीटरचे बांधकाम शौचालयासह करणे बंधनकारक आहे.रमाई घरकुल योजनेसाठी नवीन सॉफ्टवेअर आल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. यामुळे लाभधारकांना हप्ते वितरणास विलंब होत होता. परंतु आता या अडचणी दूर झाल्या आहेत. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली असून मागणीनुसार ऑनलाइन पद्धतीने देयके देणे सुरू झाले आहे. संबंधित लाभधारकांनी योजनेतील अटीनुसार बांधकामे पूर्ण करून मनपाशी संपर्क साधावा आणि योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE